Volume I| Issue X | April 2012 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.X/April 2012pp.1-4

Research Paper

# *निष्काम समाजसेवेचा महामेरू : संत गाडगेबाबा*

*किसन संदिपान पवार*
मराठी विभाग
विज्ञान महाविद्यालय, सांगोला
ता. सांगोला जि. सोलापूर.

**सारांश :**

महाराष्ट्राची भूमी वीरांची, कलावंताची व संतमहंताची कर्मभूमी आहे, या महाराष्ट्रीय भूमीत संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा, सावतामाळी, गोरा कुंभार, यांच्यासारख्या संताच्या अवतार कार्यामुळे संतमालिका सुरू झाली, या मालिकेचा पाया संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी घातला, नामदेवांनी त्याचा भारतभर विस्तार केला, एकनाथांनी त्यावर इमारत बाधंली व तुकारामांनी कळस चढविला व याचे उर्वरित कार्य संत गाडगेबाबांनी सिध्दीस नेले. म्हणूनच संत गाडगेबाबा या मालिकेतील अखेरचे शिरोमणी समजले पाहिजेत. गाडगेबाबांनी तसे नवीन काही केलेले नाही पण मागील संतानी जो मार्ग दाखविला त्यावरून डोळसपणे चालण्याचे कार्य केले, समाजात धर्माच्या नावाखाली होत असलेला अन्याय अत्याचार, अनीती दूर करण्यासाठी आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत झगडले., सुमारे पन्नास ते साठ वर्षे महाराष्ट्रात निःस्वार्थबुध्दीने समाजसेवा केली, मानवता, समाजसेवा, मानवधर्म, याचे दर्शन गाडगेबांबाच्या जीवनात पदोपदी दिसून येते.

## *प्रस्तावना :*

अमरावती जिल्हयातील शेडगांव या छोटया खेडयात 23–02–1876 या दिवशी झिंगराजी व सखुबाई या दाम्पंत्याच्या पोटी जन्म झाला, जातीने परीट घराणे शेतीची कामे करून आपली उपजीविका चालविणारे हे घराणे होते, झिंगराजीची परमेश्वरावर निंतात श्रध्दा होती. पण त्या भक्तीत डोळसपणा नव्हता. अधंश्रध्दा रूढी परंपरा, धर्माच्या नावावर शोषण या गोष्टी सतत घडत होत्या. अधंश्रध्देचे स्त्रोत खूप वाढलेले होते. त्यातच गाडगेबाबांच्या वडीलांना मद्यमासांचे व्यसन लागले, त्यात मोठे कर्जबाजारी झाले. जमीन सावकारांकडे गहाण पडली. त्याच काळजीने ते आजारी पडले, त्यातच त्यांचा अंत झाला. त्यावेळी संतगाडगेबाबांचे वय 8 वर्षाचे होते,. समोर कोणताही पर्याय शिल्लक नाही. म्हणून मामाच्या गावी गेले. तेथे त्यांनी जनावरांचे गोठे स्वच्छ करणे, रानावनात गुरे–ढोरे चरायला नेणे, व मामांना शेतीच्या कामात मदत करणे अशी कामे करावी लागली. पहाटेच्या प्रहरी दगडी जात्यावर दळण दळणा–या मामीला त्यांनी मदत केली, त्यावेळी मामीने ज्या ओव्या गायिल्या त्यामध्ये डेबुजीने आपली वाणी गोड करून घेतली. त्यामुळे गायनाचा छंद लागला. रानावनात आपल्या सवंगडयाना बरोबर घेवून गाडगेबाबा दगडाचे टाळ व फुटक्या डब्याचे मृदंग करून भजनात तल्लीन होऊन जायचे. या संवगडयात जाती, धर्म, पंथ याला अजिबात थारा नसायचा त्यात सर्व जातीची मुले असायची, त्यामुळे समतावादी विचारसरणी गाडगेबाबांनी लहानपणापासून अंगीकारली होती. मामाच्या शेतात डेबुजी शेतीची सगळी कामे करत होता. हाती पडेल ते काम नीट कुशलतने करावे ही निष्कामवृत्ती डेबुजीत जन्मतःच होती. त्यावेळच्या परंपरेनुसार लहान वयात वयाच्या 14–15 व्या वर्षी लग्न झाले. पण प्रापंचिक सुखात डेबुजी रमलेले नाहीत. मामाही कर्जाच्या ओझ्याखाली भरडून गेला व त्यातच त्यांचा अंत झाला. आलेल्या संकटाला चिकाटीने तोंड देणे हा तर डेबुजीचा धर्मच बनला होता, मामाचा बळी ज्या सावकाराने घेतला त्या सावकाराचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला व त्याला पळवून लावले त्यामुळे डेबुजी लहानपणापासून लोकांच्या व सभोवतालच्या पंचक्रोषीत प्रसिध्द झाले आणि या समाजातील अपप्रवृत्तीचा गाडगेबाबांच्या संवेदनशील मनावर परिणाम होवून ते समाजसेवेच्या व्रतासाठी बुधवार 1 फेब्रुवारी 1905 रोजी जगाचा संसार सुखी करण्यासाठी घराबाहेर पडले.

भ्रमतीच्या काळात बांबानी जे कांही कार्य केले ते विलक्षण प्रकारचे होते. अकस्मात कोणालाही हाक मारून झाडू मागून घ्यावा. स्वच्छ झाडून काढावे, गावातील विहिरीवर जाऊन तहानलेल्या जनावरांना पाणी पाजावे, शेतातील कामे करण्यात मदत करणे, कुणी भाकरीचा तुकडा दिला तर खायचा नाही तर पुढचा मार्ग धरायचा. एखादी ओझे वाहणारी बाई दिसलीतर तिच्या डोक्यावरचा बोझा घेवून तिला घरापर्यत पोहच करायची अशी वरवर चमत्कारिक वाटणारी कामे बाबा करायचे. बारा वर्षाच्या थोर तपश्चर्येनंतर समाजाच्या हितासाठी व प्रबोधनासाठी कथा–कीर्तन सांगण्यास सुरूवात केली. ज्या ठिकाणी जायचे व सांगायचे आहे अशा ठिकाणी अगोदर स्वच्छता करायची व रात्री कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करायचे. कीर्तन हे बाबांच्या समाजप्रबोधनाचे मुख्य साधन होते, अंधश्रध्दा, परंपरागत रूढी, धर्माच्या नावावर शोषण या गोष्टीचा बाबांना खूप तिरस्कार असायचा. मुर्तिपूजेपेक्षा गोरगरिबांच्या सेवेकउे त्यांचे लक्ष अधिक असायचे. सामाजिक सुधारणा व्हावी, दारूबंदी व्हावी, उच्च–नीच ही भेदभावाची कल्पना मनातून निघून जावी, शिक्षणाचा प्रसार व्हावा या सर्व उद्यात कार्यासाठी त्यांनी आपली हयात खर्च केली. राष्ट्रीय व सामाजिक कार्यासाठी व ऐक्यासाठी खूप महान कार्य केले. शोषण, काळाबाजार, व्यापारी वर्गाद्वारे होणारी शेतक–यांची लुट या गोष्टीवर त्यांनी कीर्तनातून प्रकाश टाकला. म्हणून त्यांना समाजवादी संत म्हणतात. दीनदुबळयांची सेवा हे त्यांच्या जीवनाचे व्रत, भूकेल्यांना जेवण, तान्हेल्याला पाणी, बेकारांना काम, उघडया–नागडयांना कपडा, बेघरांना आसरा, रोग्यांना औषध, गरीबांना शिक्षण, पशुपक्ष्यासाठी मूक प्राण्यांना अभय यातच त्यांचा खरा धर्म होता, ईश्वराची खरी सेवा यालाच ते मानत. केवळ गोरगरिबांच्या उध्दारासाठी एका उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठी आणि आत्मोद्वारासाठी त्यांनी सर्वस्वांचा त्याग केला. त्यामागे कर्तव्याची तळमळ होती, सा–या समाजाचे दुःख त्याना समजत होते, समाजातील विषमता, जातीयता, भ्रष्टाचार त्यांना कळून चुकला

होता त्यामुळे त्यांचे मन समाधानी नव्हते, परमार्थाचे भूत सारखे मनात नाचत होते.

अहर्निशी सदा परमार्थ करावा.
पाय न ठेवावा आडमागी

नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत महाराष्ट्राच्या सात लाख खेडयात बाबांनी नवक्रांतीला पोषक असं हे अध्यात्म कीर्तनाच्याद्वारा मुंडाशातून मस्तकापर्यंत आणि मस्तकापासून काळजापर्यंत पोहचवले. देवाचे कारखाने चालवून माणसांनी त्यांच्या बहुरूपी बाहूल्या नाचविल्या व त्या बाजारात मातीमोल किंमतीनं त्या विकल्या. नव्या मूर्तीबरोबर नवा पंथ, नवी पिढी जन्मास घातली आणि स्वतःत्या रूढीचा दास झाला, देवदानवा नरे निर्मिले हा संदेश गावोगावी फिरून लोकांना सांगितला, दीनदुबळयांची सेवा आणि निरक्षराचे प्रबोधन हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय बनून राहिले होते. भक्तीबरोबर विरक्ती, अनासक्ती आणि परिग्रहमुक्ती ही ख–या साधुत्वाची लक्षणं त्यांच्यात प्रकर्षान दिसत होती. आपल्या निःस्पृहतेच्या आधारावर समाजजागृतीचे फार मोठे कार्य केले, सेवा हो आपल्या कामाचा कणा मानून ते काम करायचे,तळागाळातील माणसांना तळ हातावरील फोडाप्रमाणे संभाळत होते. निरक्षर समाजाला साक्षर होण्यासाठी अहोरात्र झटत होते. निरीच्छ भावनेने, निस्वार्थीपणे समाजविकासासाठी ते कार्य करत होते.

कोणत्याही माणसाचे मोठेपण हे त्याच्या विचारापेक्षा आचारावर अवलंबून असते. ज्या शुद्रातिशूद्रांच्या दास्य–मुक्तीसाठी महात्मा जोतीराव फुले झगडले त्याच मुक्तीसाठी गाडगेबांबानी कर्मयज्ञ आरंभिला रूढीपरंपरेच्या जुन्या जंजाळातून अज्ञ लोकांना बाहेर काढून त्यांना सत्यजीवनाकडून जीवनसत्याकडे घेऊन जात होते. अनुभवाच्या जोरावर विज्ञाननिष्ठ जीवनाविषयी लोकाच्या मनात प्रेम निर्माण करीत होते. गरीबांना गरीबीची जाणीव करून देत होते. जीवनात शिक्षणाचे महत्व काय आहे ते सांगत होते. बांबाच्या हातात लेखणी नव्हती पण काळजाला भिडणारी वाणी होती. आपल्या अमृतवाणीने बाबांनी लोकांना अमृतमने दिली. यासाठीच त्यांनी जन्मभर निष्काम कर्मयोग स्वीकारला. प्रेम त्याचा पाया ठरला. कारूण्य त्याचा धर्म झाला. सेवाभाव त्याचे मर्म ठरले. निष्काम सेवाभावाचा मूर्तिमंत महामेरू म्हणजे सदगृरू गाडगे महाराज होत.

गाडगेबांबानी लोकसेवेतून लोकपरिवर्तनाचे केलेले काम पाहिलेतर निष्काम लोकसेवेचा अग्रदूत या शब्दातच बाबांचा गौरव करणे सार्थ ठरेल. प्रथम सत्यशोधन, नंतर समाजसुधारणा व शेवटी समाज परिवर्तन या क्रमाने समाजव्यवस्थेत आमुलाग्र बदल घडवून आणणारा विलक्षण जिद्दीचा आणि विचक्षण बुध्दीचा महापुरूष म्हणजे गाडगेबाबा. सेवाधर्मातून मानवधर्माकडे वाटचाल असणारा, परहित सरिस धर्म नही भाई. हा विचार शिरोधार्थ मानन्‌दुस–यांच्या सुखासाठी स्वतःचे विसरून काम करीत होते. गरीब माणसाच्या सुखासाठी ते रात्रंदिवस झटत होते. अज्ञान, दारिद्रय अंधश्रध्दा आणि अनारोग्याच्या अंधारात चाचपडणा–या असंख्य गोरगरीब माणसांच्या हाताला हात धरून ते त्याला ज्ञान, विज्ञान, आणि सुसंस्काराच्या प्रकाशाकडे घेऊन जात होते. आणि म्हणूनच गरीबासाठी ज्यांचे हदय द्रवते तो महात्मा होय. लोकजीवनाच्या विकासासाठी सतत कियाशील असणारा एक विचार होता. त्यांचे कार्य महान होते. विचार व जीवन हे क्रांतीकारक आंदोलन ठरले. त्यांच्या विचारांनी एक चळवळ ठरली. निष्काम सेवेची शिकवण आणि गोरगरिब लोकांच्या दुःखाशी समरस होवून त्यांच्याशी जोडलेले आईच्या प्रेमाचे नाते चिरंतन ठरले. बांबाच्या जीवनात माणुसकीचा नंदादीप तेवत होता. माणसाच्या जीवनात आनंदाचे आवार निर्माण करीत होता.

मानव सृष्टीत कौर्य, हिंसा, अन्याय, असत्य, लोभ, मत्सर, द्वेष, निंदा आणि परपीडा या गोष्टींनाा ऊत आलेला होता. बाबांनी आणि एखादया नवनीतासारखे कार्य करून माणसाला सदाचारी माणूस म्हणून जगण्यासाठी वाट दाखविण्याचे कार्य केले. समाजातील दुष्ट, शोषक, हिंसाचारी, व्यसनी, दुराचारी आणि कूर माणसांना सन्मार्ग दाखवून त्यांना चांगले कसे जगावे हे दाखवून दिले,

गाडगेबाबा बोले तैसा चाले या संतवाणीशी तादात्म्य पावलेले व्यक्तिमत्व होते, कृतीचा आणि उक्तीचा सुंदर संगम होता. कीर्तनातील वाणीला कृतीचे तेज लाभले होते. श्रोत्यांच्या काळाजाला जाऊन भिडणारा शब्दांचा वर्षाव त्यांच्या कीर्तनातून असायचा, अमृताजे पैजां जिकंणारी बोलीभाषा, लोकमानसाच्या प्रदेशातील विचार हे कीर्तनाचे विशेष असायचे. एकाचवेळी विचारवंत व कृपावंत त्यातून दिसायचे. त्यामुळे त्यांच्या विचारांची उंच व कृपेची करूणा त्यांच्या कीर्तनातून ओसंडून वहात होती. बाबांची कीर्तने म्हणजे जनसामान्यांच्या आचारविचारामध्ये आमुलाग्र क्रांती घडवून आणणारी तुतारी होती. समाजजीवनाची सांस्कृतिक, आर्थिक, आणि शैक्षणिक घडी बसविण्याची ती एक नांदी होती. सामान्यांच्या काळजाला जाऊन भिडणारी ती एक आर्त किंकाळी होती. गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपाळा या गजरात आपल्या कीर्तनाला सुरूवात करायचे. समाजातील अंधश्रध्दा व मानवतेची शिकवण हेच त्यांच्या कीर्तनाचे विषय असायचे. समाजात अंधश्रध्देच्या पाठीमागे लागलेल्या व फुटकळ देवदेवतांची पूजा करून त्याचे स्त्रोत माजविणा–या अज्ञ जनांना प्रबोधन करतांना ते म्हणायचे.

देव दगडाचा ! पाथवरट त्याचा बाप झाला !!
देव सोनियाचा केला ! त्याचा सोनार बाप झाला !!
देव मातीचा बनविला ! त्याचा कुंभार बाप झाला !!
देव आहे अंतरात ! जैशा हात तैशी मूर्त !!

यावरून देव एकच आहे हे सगळे माणसांच्या मनाचे खेळ आहेत, नवससायास करून स्वतःच्या जीवनाची अधोगती करून घेणा–या अंधजनांना त्यांनी जागृत करण्याचे महान कार्य केले. घरात लेकरूबाळ नाही म्हणून देवाला नवस करणा–यांना त्यांनी त्याच शब्दांत प्रबोधन केले.

नवसे कन्यापूत्र होती तर मग करने लगे पती
टसे सामान्यांचे विषय त्यांच्या कीर्तनातून असायचे.
वेड लागले जगाला ! देव म्हणती धोंडयाला !
गोपाळा ! गोपाळा ! देवकीनंदन गोपाळा !!

देव दगडात नसून तो त्याच्या सेवाभावी कर्मात आहे हे त्यांनी पटवून दिले. सर्वसामान्य जनतेला फसवून पंडिताचे आणि वायफळ पांडित्यांचे स्तोम माजवणारा शुद्र अहंकार राष्ट्रद्रोही व जनताद्रोही असतो. याचे प्रत्यंतर घडविणारा निरहंकारी संत म्हणजे देवकीनंदन श्री गाडगेमहाराज !

लोकांच्या बुध्दीत व सारासार विवेकाला त्यांची आवाहान केले. त्यांनी धर्मतत्वे व नवधर्म समजावून घेतला पाहिजे.
तीर्थी धोंडा पाणी ! देव रोकडा सज्जनी !!
नारायण असे विश्वी ! त्याची पुजाकरीत जावी !!
या कारणी तोजवावी ! कोणी तरी काया !!
तुका म्हणे ऐसी बुध्दी ज्याची जड ! त्याहुनी दगड बरा देवा!!

हा तुकाराम महाराजांचा विचार बाबांच्या कीर्तनाचा कणा ठरलला होता.

कृतीमुळे विचारांना मूल्य येते. स्वावलंबी जीवन जगणे हा त्यांचा मगंलघोष होता. अन्न, वस्त्र, निवारा या स्वतःसाठी लागणा–या प्राथमिक गरजा स्वतःच मिळविल्या पाहिजेत. ही शिकवण बाबांनी समाजात दिली. स्वच्छतेचे महत्व सांगितले. वारक–यासाठी धर्मशाळा बांधल्या, नदीवर घाट बाधंले, धर्मशाळा

सर्वासाठी खुल्या ठेवल्या. त्यासाठी मिशन नावाने संस्था उभारली. श्री गाडगे महाराज मिशन ही संस्था कार्यरत झाली. अस्पृश्योद्दार व समतेचा प्रचार हे तिचे बिद्र ठरले. लोककल्याणाच्या उपक्रमाना चालना हे तिचे कार्य ठरले. मुंबई, पुणे, नाशिक, पंढरपूर अशा ठिकाणी धर्मशाळा बांधण्यात आल्या, आज या सर्व संपत्तीची किंमत अब्जावदी रूपयाची आहे. पण तो सर्व संस्थेचा हक्क, बाबांच्या नातेवाईकांचा त्यात काही अधिकार नाही, लोकांकडून मिळविलेल्या संपत्तीचा सुई इतकाही भाग स्वतच्या मुलाला व नातेवाईकाला ठेवला नाही, हा मोठा त्याग त्यांनी केला आहे,

असे हे महान गाडगेबाबा निष्काम कर्मयोगी होते, त्यामुळे त्यांना कधी टाळ, माळ, मृदंग, गंध आणि धूप–दीप याची गरज भासली नाही. कारण ते लोकयोगी संत होते. निस्वार्थी लोकप्रेमापोटी चाललेली लोकसेवा हे त्यांचे भजन होते. सामान्य लोकांच्या जीवनात असामान्य आनंद निर्माण करणे हेच त्यांचे अभंग होते. अशाप्रकारे लोकजीवन सुखी व संपन्न करण्यासाठी अहोरात्र राबणारे लोकसंत होते. गाडगेबाबा ! बाबांनी जिवनभर लोकमंगल भावनेचे उदात्तीकरण केले. आणि म्हणूनच साधू दिसती वेगळाले ! परीते स्वरूपी मिळाले या समर्थाच्या उक्तीत सार्थता बाबांनी सिध्द करून दाखवली. अश या महान समाजसुधारकाचा अंत वयाच्या 80 व्या वर्षी म्हणजे 20–12–1956 या दिवशी झाला. गाडगेबाबांनी केलेल्या महान समाजसेवेची व त्यागाची भारताच्या संत इतिहासात नोंद राहील यात काही संशय नाही.

### *संदर्भग्रंथ :–*

1.श्री गाडगेबाबा आणि त्यांचे कार्य –स. सी. बानुबाकोडे.
2.श्री. संत गाडगेबाबा– कृ. गो. वानखेडे.
3.कथा गाडगेबाबांची –शं. रा. देवळे
4.श्री. गाडगेबाबा गौरवग्रंथ–प्राचार्य, रा. तु. भगत. 1991



*किसन संदिपान पवार*
मराठी विभाग , विज्ञान महाविद्यालय, सांगोला
ता. सांगोला जि. सोलापूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org